महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

क्र. मु.अ. (वा)/लेखा/ईडी-७/ No 30410 दिनांक : 16 SEP 2009

परिपत्रक क्र. १०७

विषय :- राज्यातील विदर्भ व मराठवाडा औद्योगिक ग्राहकांना विद्युत शुल्क माफी/सुट.

संदर्भ :- १) शासन अधिसुचना क्र. ईएलडी २००९/प्र.क्र.-६/ऊर्जा-१ दि. २६.०५.२००९.
२) शासन पत्र क्र. ईएलडी-२००९/प्र.क्र.२४५/ऊर्जा-१ दि. २७.०८.२००९..

शासन अधिसुचना दि. २६.०५.२००९ अन्वये विदर्भ व मराठवाडयातील औद्योगिक ग्राहकांना पूर्वलक्षी प्रभावाने दि. ०१.०४.२००९ पासुन विद्युत शुल्क भरण्यापासून माफी/ सुट देण्यात आली आहे. (परिपत्रक क्र.१०१) शासन अधिसुचना प्राप्त होईपर्यंतच्या म्हणजे दि. ०१.०४.२००९ ते ३१.०५.२००९ या कालावधीमधील आकारणी / वसुल करण्यात आलेले विद्युत शुल्क, या कार्यालयाव्दारे सुचित करेपर्यत ग्राहकांस परतावा समायोजन करु नये असे सुचित केले होते.

तद्वत, शासन पत्र दि. २७.०८.२००९ अन्वये, उपरोक्त कालावधीत वसुल करण्यात आलेली विद्युत शुल्काची रक्कम, अशा औद्योगिक घटकांकडून मागणी आल्यास, संबंधीत विद्युत निरिक्षकाच्या मंजुरीनेच, सदर औद्योगिक घटकास समायोजनाने परत करण्यास अनुमती देण्यात आली आहे.

१) जर ग्राहकांची थकबाकी, परत करावयाच्या रकमेएवढी किंवा जास्त असेल तर संपूर्ण रकमेचे समायोजन करणे.
२) उपरोक्त समायोजननेनंतरही परतावा शिल्लक राहत असेल किंवा ग्राहकांकडे थकबाकी नसेल तर मासिक बिलाच्या ३० टक्के पर्यंत किंवा जास्तीत जास्त तीन हप्त्यात समायोजन करावे.
३) व्यवस्थापक (अर्थोपाय) यांना विद्युत शुल्काची रक्कम कळवितांना परताव्याची रक्कम स्वतंत्रपणे दाखवावी.
४) विद्युत शुल्क 'क' विवरण पत्रात सदरची नोंद घेण्यात यावी.
५) कोणत्याही परिस्थितीत समायोजित करण्यात आलेली विद्युत शुल्काची रक्कम पुन्हा शासनाकडे भरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
६) सदर रक्कमेचे समायोजन पूर्वी झाले नसल्याची खात्री करावी.
७) अशा परताव्या रकमेची संगणक प्रणालीमध्ये नोंद घेण्यात यावी.

15/09

मुख्य अभियंता (वाणिज्य)

प्रत रवाना :-

१. मुख्य अभियंता, सर्व सं व सु परिमंडळ कार्यालये.
२. अधिक्षक अभियंता, सर्व सं व सु मंडळ कार्यालये.

मु.अ./वाणिज्य/आवक क्र.7350
तारीख 10 SEP 2009

2408
दिनांक 10/9/09

महाराष्ट्र शासन

क्रमांक ईएलडी २००९/प्र.क्र.२४५/ऊर्जा-१,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २७ ऑगस्ट, २००९

प्रति,

मुख्य अभियंता (वाणिज्य)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

मुख्य अभियंता (विद्युत)
सार्वजनिक बांधकाम विभाग,
प्रशासकीय इमारत, तिसरा मजला,
रामकृष्ण चेंबुरकर मार्ग,
चेंबुर (पूर्व), मुंबई ४०००७१

विषय:- विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक ग्राहकांकडून एप्रिल व मे २००९ या महिन्यात वसूल केलेल्या विद्युत शुल्काच्या परताव्यासंबंधी

संदर्भ:- आपले पत्र क्रमांक मुअ(वा)/लेखा/ईडी-७/१९६३९, दिनांक १७ जून २००९

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्यात येते की, विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक ग्राहकांना विद्युत शुल्क माफीची सवलत पुढे चालू ठेवण्याची अधिसूचना उशिरा निर्गमित करण्यात आल्यामुळे, ज्या औद्योगिक घटकांना दिनांक ३१ मार्च, २००९ रोजी विद्युत शुल्क माफीची सवलत लागू होती, अशा घटकांकडून मागणी आल्यास दिनांक १ एप्रिल, २००९ नंतर वसूल करण्यात आलेली विद्युत शुल्काची रक्कम संबंधित विद्युत निरिक्षकाच्या मंजूरीने सदर औद्योगिक घटकास समायोजनाने परत करण्यास महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना अनुमती देण्यात येत आहे.

आपणास कळविण्यात येते की, विदर्भ व मराठवाडयातील औद्योगिक ग्राहकांना एप्रिल, २००९ व मे,२००९ मधील विद्युत शुल्काच्या परताव्याची रक्कम उपरोक्त पध्दती अवलंबून त्वरीत अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तरमहा शासनाला सादर करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(मोहन पांढरपट्टे)
शासनाचे अवर सचिव